# प्रसिध्दीपत्रक

दि.२२ /०१/२०२५

कृषी विभागातील कृषी आयुक्तालयाच्या व अधिनस्त कार्यालयांच्या आस्थापनेवरील लघुटंकलेखक, लघुलेखक (निम्न श्रेणी), लघुलेखक (उच्च श्रेणी) संवर्गातील सरळसेवा भरतीच्या जाहिरातीनुसार झालेल्या ऑनलाईन परीक्षेच्या निकालाच्या आधारे सदर पदाच्या व्यावसायिक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमदवारांची व्यावसायिक चाचणी घेणेबाबत आयुक्तालय स्तरावरुन कार्यवाही सुरू आहे.

त्याअनुषंगाने व्यावसायिक चाचणी घेणाऱ्या संबधित यंत्रणेकडून परीक्षेची दिनांक कळविण्यात आलेली असून व्यावसायिक चाचणी कृषी विभागाच्या ८ विभागांमध्ये दि.०१.०२.२०२५ व दि.०२.०२.२०२५ रोजी घेण्यात येणार आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र उमेदवारांना त्यांनी आवेदन पत्रामध्ये सादर केलेल्या त्यांच्या वैयक्तिक ई-मेल आयडी वर पाठविण्यात येईल. ज्या परीक्षार्थींना प्रवेशपत्र (Hall Ticket) बाबतचा ई-मेल प्राप्त झालेला नाही त्यांनी संबंधित विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयात २८ ते २९ जानेवारी, २०२५ रोजी संपर्क साधावा.

प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. अधिक माहितीसाठी www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट दयावी.

**मा. आयुक्त कृषी यांचे मान्यतेने.**

(गणेश घोरपडे)
कृषी सहसंचालक (आस्थापना)
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

Scanned with OKEN Scanner

Scanned with CamScanner